


# जेव्हा चाकाची हवा जाते

जयंत नारळीकर

❑❑ मी अकरा–बारा वर्षांचा असेन... आणि माझा भाऊ दोन वर्षांनी लहान. आमचे वसंतामामा नुकतेच परदेशात शिकून 'डॉक्टर' बनून आले होते. त्यांच्याबरोबर आम्ही एक ट्रिप काढायची ठरवली... **टांडचा फॉल्सची.**

❑❑ आम्ही राहत होतो बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या आवारात. तिथून सत्तर–ऐंशी किलोमिटरचा पल्ला गाठायचा होता. भाड्याची मोटारगाडी ठरवली. आईने पिकनिकचे खाद्यपदार्थ केले. सकाळी (पहाटेच) ठरल्या वेळेला गाडी आली. ड्रायव्हरने एक सहाय्यक पण बरोबर आणला होता. त्याची व्याद कशाला? आम्ही विचारले. ''साहेब लांब जायचेय, अडी अडचणीला हाताशी मदत असलेली बरी'' ड्रायव्हर उत्तरला. नेहमी पुष्कळ





सावधगिरी बाळगणारे वसंतमामा – त्यांनी पण ड्रायव्हरला दुजोरा दिला. गाडी ऐसपैस अमेरिकन बनावटीची होती तेव्हा जागेची अडचण नव्हती.

❑ ❑ ही सावधगिरी उपयोगी पडली. अर्ध्या वाटेवर गेल्यावर टायर पंक्चर झाले! ड्रायव्हर आणि सहाय्यक (त्याचे नाव बनवारी) दोघांनी स्टेपनी काढून बसवली. अर्ध्या तासाचा खोळंबा म्हणजे काही फार नाही. '' साहेब मिर्जापूरमध्ये चाक दुरुस्त करू'' ड्रायव्हरने आश्वासन दिले.

❑❑ टांडच्या फॉल्सला पोचलो. पिकनिक उरकले आणि मिर्जापूरकडे गेलो. ट्यूबचे पंक्चर नीट केले आणि निघालो... तर दुसऱ्या टायरने दगा दिला! पुन्हा चाक बदलणे.... पण सुदैवाने शहराबाहेर गेलो नव्हतो म्हणून ती ट्यूबपण दुरुस्त होऊ शकली. ''आता तरी सर्व सुरळीत होईल ना ?'' ''होय साहेब...'' ड्रायव्हर उत्तरला. आणि अर्ध्या तासांनी तिसऱ्या टायरने असहकार पुकारला. ड्रायव्हर आणि बनवारी दोघांनी तिसऱ्यांदा चाक बदलले.

❑ ❑ रस्ते फार चांगले नव्हते... पण ड्रायव्हरने आणलेल्या गाडीच्या ट्यूबसही जुन्या पुराण्याच होत्या. आणि आता आम्ही शहरापासून लांब होतो. मामांनी विचारले ''पुन्हा एखादी टायर गेली तर ?''

❑ ❑ ''साहेब तसे होणार नाही. मी काळजीपूर्वक चालवतो'' ड्रायव्हर आशावादी होता. पण गाडीच्या मनात वेगळेच होते. पंधरा मिनिटांनी धक्के बसले... ड्रायव्हरने कार थांबवली. एक पंक्चर!

❑ ❑ आता स्टेपनी पण पंक्चरवालीच होती. रस्त्यावर रहदारी कमी. संध्याकाळ होत आलेली. ''साहेब ट्यूब काढून टायरमध्ये गवत भरतो.'' ड्रायव्हरने डोके लढवले. त्याने आणि बनवारीने जवळच्या शेतातले गवत कापून ठसाठस भरले. गाडी पुन्हा चालू केली.

❑❑ पण हे कुठपर्यंत टिकेल ? गवताला आग लागली तर... ? आम्ही ड्रायव्हरला सांगितले. हळू चालवायला. बस मिळाली तर पाहूया.

❑❑ इतक्यात वाटेत काही घरे दिसली. बाहेर एक माणूस उभा होता. त्याला विचारले इथून एखादी बस मोगलसराई (बनारस नजीकचे रेल्वे जंक्शन) कडे जाते का.

❑❑ “होय, अर्ध्या तासात येईल एक बस. तोपर्यंत तुम्ही माझ्या घरी च्या घ्या.” आम्हाला तो एक देवदूतच वाटला! सांगितल्याप्रमाणे आम्ही त्याच्या घरी चहा घेतल्यावर त्याने आम्हाला बसमध्ये बसवून दिले. ड्रायव्हर आणि बनवारी कारजवळ राहिले.

❑❑ पण अजून आमचा फजितीचा पाढा संपला नव्हता. मोगलसराई ते बनारस मार्गात गंगेवरचा मालवीय पूल वाहतुकीसाठी बंद होता. पण पायी जायला परवानगी होती. पुलावरच्या बांधकामातून मार्ग काढत दीड मैल चालून आम्ही अखेर ‘काशी’ स्टेशनजवळ आलो. रिक्षा पकडून घरी पोचेपर्यंत रात्रीचे दोन वाजले होते.

❑❑ ती टांड्या फॉल्सची ट्रीप अशी संस्मरणीय आहे ती ‘पंक्चरवर पंक्चर’नी केलेल्या फजितीमुळे.

आय.यू.सी.सी.ए. पुणे विद्यापीठ आवार,
गणेशखिंड, पुणे – ४११००७७